बेलीफ रिपोर्ट नि ७/क

दि. ७/२/२०२६

कि. दि. अ. ७३/२०२६

यशोदा / निरंक

प्रतिज्ञेवर सविनय सेवेत रिपोर्ट सादर कि,

दिनांक ६/२/२०२६ रोजी नमुद दिलेल्या पत्यावर जावून सदर प्रकरणाची जाहिरनामा प्रत

313 जायमोक्यावर डकवून प्रसिद्ध केली कुणाचे काही आक्षेप असेल तर मे. न्यायालयात सादर करावे, असे जाहिर केले. सोबत पंचनामा जोडला आहे.

करीता जाहिरनामा बजावून परत

समक्ष

एम. आर. खरसाडे
(बेलीफ)

७/२/२६

स. अधिक्षक
ग्रा.क.स्तर गेवराई

१२-३-२६

12-3-26

पंचनामा

दिनांक 6/2/26

कि. दि. अ. 73/2026 धारा/क्रि. निरंक

कारणे पंचनामा लिहून देतोत कि आज दिनांक 6/2/2026 रोजी गेवराई कोर्टाचे बेलिफ नमुद प्रकरणातील गावात येवुन जायमोक्यावर जाहिरनामा पत्र डकवुन प्रसिद्ध केली कुणाचे काही आक्षेप असेल तर त्याने मे. कोर्टात सादर करावे असे जाहिर केले. हा पंचनामा खरा व बरोबर आहे. पंचनामा वाचून त्यावर सह्या केल्या आहे.

विठ्ठल बापु जाधव

वसंत दुधा राठोड

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ७३/२०२६**

यशोदाबाई **— विरूध्द— निरंक**

(मार्फत — ॲड ए.एस.राठोड )

ज्याअर्थी मयत नामे **गोटीराम पि.उत्तम पवार** हे/या **दिनांक १०.१२.२०२२** रोजी मौजे **पाचेगाव ता. गेवराई जि.बीड** येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार -

१) यशोदाबाई भ्र**.** उत्तम पवार
वय ७० वर्षे धंदा- शेती
रा.वसंत नगर तांडा, पाचेगाव ता. गेवराई जि. बीड.

२ उत्तम पि**.** वालु पवार
वय ७८ वर्षे धंदा- शेती
रा.वसंत नगर तांडा, पाचेगाव ता. गेवराई जि. बीड.

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे **गोटीराम पि.उत्तम पवार रा. वसंतनगर तांडा, पाचेगाव ता.गेवराई जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : १२.०३.२०२६

आदेशावरुन,

29-1-26

कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर. गेवराई

प्रति,

**मुख्य बेलीफ,**
**दि. न्या. क.स्तर, गेवराई**

याची एक प्रत अर्जदाराची जमीन असलेले गावात जायमोक्यावर/नोटीस बोर्डवर/ अथवा चावडीमध्ये डकवुन पंचनाम्यासह अहवाल दाखल करावा.

प्रति,
मा. संपादक,
दैनिक_____
कार्यालय, बीड यांचेकडे प्रसिध्दीस्तव रवाना

**नोट — आपली प्रसिध्दी फीस या न्यायालयात जमा नाही.**

(सहायक अधीक्षक)
**दिवाणी न्यायालय क.स्तर. गेवराई**

29.1.26